# प्रकरण दुसरे

## "स्त्री-गर्भाधान ते उपनयन संस्कार."

"तूष्णीमेताः क्रियाः स्त्रीणां विवाहस्तु समन्त्रकः ।"

(या.स्मृ.1.2.13)

"षोडशर्तुःनिशाः स्त्रीणां तस्मिन् युग्मासु संविशेत् ।
ब्रह्मचार्येव पर्वाणाद्याश्चतस्त्रश्च वर्जयेत्।।"

(या.स्मृ.1.3.79)

## प्रकरण दुसरे

## स्त्री-गर्भाधान ते उपनयन संस्कार·

**प्रस्तावना :-**

मानवी जीवनात संस्कारांना अतिशय महत्त्व आहे· संस्कारित व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व त्यामुळे परिपूर्ण होते, त्याला उठावदारपणा प्राप्त होतो· फार पूर्वीपासून हे संस्कार प्रचलित आहेत· याज्ञवल्क्यस्मृतीतील स्त्री-संबंधी विचार करीत असता तिच्याबाबतीत कोणते संस्कार केले जात असत, त्यामधील तिचे स्थान इ·बाबत विचार करणे आवश्यक ठरते·

**संस्कार म्हणजे काय ?**

संस्कार हे सर्वच धर्मात, जाती-जमातीत थोडया फार फरकाने सारखेच केले जातात· "संस्काराचा अर्थ चांगले करणे, शुद्ध करणे, वस्तूतील वैगुण्य दूर करून तिला नवे आकर्षक रूप देणे, असा बहुविध आहे· अर्थात ज्या क्रियेच्या योगाने मनुष्याच्या ठिकाणी सद्‌गुणांचे विकसन व संवर्धन होते, त्या क्रियेला संस्कार म्हणावे·"[1]

"मानवी जीवनात संस्कार हे माणसाच्या शारीरिक व मानसिक स्थित्यंतराचे द्योतक ठरतात· संस्कारामुळे माणसाला योग्य तो सामाजिक दर्जा प्राप्त होतो· संस्कारात अनेक आरंभिक विचार, धार्मिक क्रियाकलाप, त्यांच्याबरोबर येणारे काही नियम व आचरणपद्धती यांचा समावेश होतो· या सर्वांचा उद्देश केवळ औपचारिक देहसंस्कार एवढाच नाही· तर संस्कारीत व्यक्तीच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा परिष्कार, शुद्धी आणि पूर्णता एवढा व्यापक आहे·"[2]

**याज्ञवल्क्याने सांगितलेले संस्कार :-**

याज्ञवल्क्यस्मृतीमध्ये उपोद्‌घात प्रकरणानंतर ब्रह्मचारी प्रकरणाच्या प्रारंभीच याज्ञवल्क्याने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण सांगून त्यापैकी प्रथम तीन वर्णांना "द्विज" असे

म्हटले आहे. .या द्विजांच्या गर्भाधनापासून ते अंत्यसंस्कारापर्यंतच्या क्रिया वैदिक मंत्रांनी कराव्यात असे सांगितले आहे.[3]

यानंतरच्या श्लोकांमध्ये गर्भाधानादि संस्कारांचे वर्णन केले आहे. विविध प्रकारचे चाळीस संस्कार सांगितले जातात. त्यापैकी महत्त्वाच्या संस्कारांचे वर्णन[4] याज्ञवल्क्याने असे कले आहे-

"गर्भाधानमृतौ पुंसः सवनं स्पन्दनात्पुरा।
षष्ठे अष्टमे वा सीमन्तो मास्येते जातकर्म च।।
अहन्येकादशे नाम चतुर्थे मासि निष्क्रमः।
षष्ठे अन्नप्राशनं मासि चूडा कार्या यथाकुलम्।।"

ऋतुकाली गर्भाधान, गर्भाचे चलन होण्यापूर्वी पुंसवन, सहाव्या किंवा आठव्या महिन्यात सीमेन्तोन्नयन, यानंतर जातकर्म, अकराव्या दिवशी नामकरण, चवथ्या महिन्यात निष्क्रमण म्हणजे सूर्यदर्शन, सहाव्या महिन्यात अन्नप्राशन, कुलाचारानुसार चौलकर्म सांगितले आहे.

**संस्कारविषयक माहिती :-**

स्त्रीच्या ऋतुकाली "गर्भाधान" हा संस्कार केला जातो. गर्भधारणेकरीता हा संस्कार केला जातो. ह्या संस्काराचे स्वरूप असे वर्णन केले जाते - "गर्भाधानप्रसंगी पत्नी तांदूळ आणि जव किंवा यव आणि दूध यांच्यायोगे तयार केलेले अन्न सेवन करते. "लक्ष्मी" नांवाच्या वृक्षाचे फळ, वडाची देठे किंवा "सहदेवी"चे फळ घेऊन त्याचा रस काढून तो पुत्रप्राप्तीची इच्छा असेल तर तो पत्नीच्या उजव्या नाकपुडीत घातला जातो आणि कन्येची इच्छा असल्यास हा रस डाव्या नाकपुडीत सोडला जातो. यानंतर पती विष्णुमंत्र म्हणून पत्नीवर जलसिंचन करतो. गर्भाधान या संस्काराने उत्पन्न झालेल्या पुत्राला ब्रह्मविद्येचा अधिकार प्राप्त होतो असे म्हटले आहे. हे संस्कार गर्भाच्या मातेवर म्हणजे स्त्रीवर केले असले तरी ते पुत्राच्या बाबतीत - पुत्रकामनेने केलेले आहेत. स्त्रीवरील हे संस्कार नव्हेत.

यानंतरचा "पुंसवन"विधी पुत्रप्राप्तीसाठी केला जातो. हा विधी गर्भाधान झाले हे निश्चित झाल्यानंतर तिस-या महिन्यात करतात. चरकसंहितेत पुंसवन या

संस्काराविषयी माहिती आढळते ती अशी - गर्भधारणेनंतर दुस-या किंवा तिस-या महिन्यात हा संस्कार केला जातो· या संस्कारामुळे गर्भाचे लिंग परिवर्तन होऊ शकते असा समज होता· मुलगा व्हावा या उद्देशाने पुरुषलिंगाचे प्रतीक असलेले पदार्थ या संस्कारात विशिष्ट पद्धतीने वापरले जातात· चंद्र पुरुष नक्षत्रात असताना हा संस्कार करावा, असे धर्मशास्त्रांनी सांगितले आहे· चरक म्हणतो की, सोने, चांदी वा लोखंड या धातूची लहान अशी पुरुषाकार प्रतिमा करून ती तापवावी आणि दही, दूध वा पाण्यातून पिऊन टाकावी· आणखी असेही म्हटले आहे, "याखेरीज ब्राह्मण वा आपस्त्रिया पुंसवन म्हणून ज्या ज्या गोष्टी सांगतील त्या-त्या कराव्यात·" पुत्रकामना असेल तर स्त्रीच्या उजव्या नाकपुडीत विशिष्ट वनस्पतीचा रस घालावा" असे सुश्रुताने म्हटले आहे· याउलट कन्यार्थाने स्त्रीच्या डाव्या नाकपुडीत रस घालावा या अर्थाची वाक्येही आढळतात·

एकंदरीत "पु" म्हणजे पुरुष आणि "सवन" म्हणजे जन्म देणे हा पुंसवन या शब्दाचा अर्थ आहे· पुंसवन विधीमुळे गर्भलिंगात परिवर्तन होते अशी भावना आढळते· पुत्रप्राप्तीकरिताच हा संस्कार विशेषत्वेकरून सांगितला आहे· तो गर्भचलनापूर्वी करण्यात येतो·

यानंतर पुढे 6 व्या किंवा 8 व्या महिन्यात "सीमंतोन्नयन" हा षोडशसंस्कारां-पैकी एक संस्कार केला जातो· हा चंद्र पुरुषनक्षत्रामध्ये असताना केला जातो· पत्नी अग्निच्या पश्चिमेस पूर्वाभिमुखी बसते· अशा स्थितीत पती तिचे केस बरोबर मध्ये तीन पांढरे ठिपके असलेल्या साळ पक्ष्याच्या काट्याने मधोमध दुभंगतो· यालाच सीमन्त उन्नयन असे म्हटले जाते· या विधिप्रसंगी पुल्लिंगी पदार्थ वापरले जात· तांदूळ, यव व तूप यांच्या मिश्रणाने स्थालीपाक तयार केला जात असे· स्थालीपाकाकडे पाहून पत्नी, "मला पतीचे पुत्र, पशू व दीर्घायुष्य, उत्कर्ष दिसत आहे" असे म्हणत असे· याप्रसंगी विविध मंगलकृत्ये करताना स्त्री ही पतिपुत्रवती असावी अशी अपेक्षा बाळगली जात असे·

गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन हे संस्कार गर्भधारण करणा-या स्त्रीवर केले जात· या संस्कारात त्या स्त्रीच्या उदरी पुरुषगर्भ अशी कामना केली जाई· त्यामध्ये कन्यागर्भाची उपेक्षाच केली आहे· पुढे जातकर्म इ·ठिकाणी देखील कन्येचा उल्लेख नाही· एकंदरीत यावरून कन्येबाबत उदासीनता दिसते·

"जातकर्म" हा संस्कार प्रसूतीच्या वेळेस केला जातो. मिताक्षरासारामध्ये "गर्भाशयातून "पुत्र" बाहेर आला असता जातकर्म" असे भाषांतर आढळते. ह्यामध्ये प्रसूतिगृह हे विशिष्ठ प्रकारे तयार केले जाते. "आयुष्यहोम", "कुमाराभिमंत्रण" आणि "प्राशन" हे जातकर्माच्या संबंधात तीन महत्त्वाचे विधी केले जातात. पिता हा या प्रसंगी पुत्राच्या रक्षणासाठी व दीर्घायुष्यासाठी प्रार्थनामंत्र म्हणतो. स्तनपान आणि उत्थान यासारख्या लहान विधींचा समावेशही यामध्ये होतो. इ.प्रकारचे स्वरूप हे जातकर्म संस्काराचे आहे.

यानंतरचा "नामकरण" हा संस्कार जन्मानंतर अकराव्या दिवशी सांगितला आहे.

चौथ्या महिन्यात बालकाच्या "निष्क्रमणाचा" म्हणजे सूर्यदर्शनाचा संस्कार, तर सहाव्या महिन्यात "अन्नप्राशनाचा" म्हणजे उष्टावनाचा संस्कार सांगितला आहे.

"चौल कर्म किंवा "चूडा कर्म", ज्याला आपण जावळ काढणे असे म्हणतो, तो हा संस्कार कुलाचाराप्रमाणे पहिल्या किंवा तिस-या वर्षी केला जातो. यामध्ये बालकाच्या डोक्यावरील सर्व केस किंवा काही बटा काढल्या जातात. चूडा म्हणजे केस. हे ठेवण्यापूर्वी "जोक् सूर्यं दृशे" इ.मंत्र म्हटले जातात. चूडाकर्माविषयी विविध मते आढळतात. हा विधी केल्यानंतर मुलगा सांकेतिकरित्या नवीन होतो. अर्थातच केसाच्या रूपात त्याचे बलिकर्म संपन्न होते. पिता पुत्राला उद्देशून आयुष्यवर्धनाची इच्छा व्यक्त करतो.

"उपनयन" हा संस्कार देखील महत्त्वाचा मानला आहे. या शब्दाचा व्युत्पत्त्यर्थ "जवळ नेणे" असा आहे आणि या जवळ जाण्यात, बटूचा आचार्याच्या जवळ जाण्याचा भाग मुख्य आहे असे परंपरेत सांगितले आहे. आचार्याजवळ जाण्यातील हेतू हा वेदाध्ययन म्हणून सांगितला आहे. पण क्वचित् हे उपनयन ब्रह्मचारी जीवनाकडे नेण्यासाठी होय असाही उल्लेख आहे. ब्रह्मचर्यात केवळ वेदाध्ययनच नव्हे, तर विशिष्ठ शिस्तीच्या जीवनाचा अंतर्भाव असल्याने हा संस्कार महत्त्वाचा आहे. वेदांच्या व इतर विद्यांच्या अध्ययनाने ऋषींचे ऋण मनुष्य फेडतो. आचार्यांकडून किंवा ऋषींकडून प्राप्त झालेले दिव्य धन तो आत्मसात करतो. या ज्ञानाने त्याचा एकप्रकारे पुनर्जन्म होतो, असे मानले आहे.

हे उपनयन केव्हा करावे - अर्थात कालावधी सांगत असता याज्ञवल्क्य म्हणतो - "ब्राह्मणाच्या पुत्राचे उपनयन गर्भधारणेपासून आठव्या वर्षी किंवा जन्मापासून

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आठव्या वर्षी, क्षत्रियाच्या पुत्राचे गर्भापासून किंवा जन्मापासून अकराव्या वर्षी व वैश्याच्या पुत्राचे गर्भापासून किंवा जन्मापासून बाराव्या वर्षी करावे. काही म्हणतात की ते कुलाचाराप्रमाणे करावे."[5] ब्राह्मणाचे उपनयन सोळाव्या वर्षापर्यंत, क्षत्रियांचे अठराव्या वर्षापर्यंत आणि वैश्याचे चोविसाव्या वर्षापर्यंत लांबविता येते. असा उल्लेख §तु.मनु.1.65§ आढळतो.

विवाह संस्कार हा देखील मानवाच्या जीवनातील महत्त्वाचा संस्कार आहे. या संस्काराबाबतची चर्चा "वैवाहिक जीवन" या पुढील प्रकरणात केली जाणार आहे. त्यामुळे प्रस्तुत ठिकाणी केवळ नामोल्लेख करणे युक्त वाटते.

## संस्कारांपाठीमागील हेतू :-

गर्भाधान इ.प्रत्येक संस्कार हा वेगवेगळ्या हेतूसाठी केला जातो. संस्कारांचा धर्मशास्त्रीय प्रयोग सारखा असला तरी त्याबाहेर संस्काराची काही लौकिक अंगेही आहेत. त्या प्रत्येकाचा हेतू हा निरनिराळा असतो. एकाच संस्कारात संस्कारित व्यक्तीला अनेक शुभ फले प्राप्त व्हावी व अशुभ फलांचे निवारण व्हावे यासाठी संस्कारामध्ये विविध कृत्ये ही एकत्रित केली जातात. या संस्कारापाठीमागील अशुभ प्रभावांचा प्रतिकार, , शुभ प्रभावांचे आकर्षण ही प्रयोजने; सांस्कृतिक, नैतिक व अध्यात्मिक प्रयोजनांचा डॉ.राजबाली पाण्डेय यांनी केलेल्या विचारांचा उल्लेख संस्कृतिकोशाच्या नवव्या खण्डामध्ये आला आहे.

## याज्ञवल्क्याचे संस्कारविषयक मत :-

याज्ञवल्क्याने देखील या संस्काराचे फल सांगत असता म्हटले आहे- "गर्भाधानादी संस्कार केले असता माता व पिता यांच्या शरीरगत व्याधींमुळे शोणित व शुक्र यामध्ये असलेला दोष नाहीसा होतो"[6] मनूने देखील §2.26§ म्हटले आहे की गर्भाधानादी शारीरिक संस्कार वैदिक कर्मांच्या आधारे करावे. त्यामुळे संस्कार्य व्यक्तीचे इहलोक व परलोक दोन्ही लोक शुभ व प्रशस्त होतात. याज्ञवल्क्याने देखील या विचारांना पाठिंबा दिलेला दिसतो. संस्कारापाठीमागील उद्देश हा चांगला आहे. संस्कारामुळे मनुष्य हा अंतर्बाह्य शुद्ध होतो. खऱ्या अर्थाने त्याचा पुनर्जन्म होतो.

याज्ञवल्क्याने वैदिक मंत्राच्या द्वारे संस्कार करण्याचा अधिकार फक्त चातुर्वर्ण्यापैकी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णांनाच दिला आहे. शूद्रांच्या अधिकाराचा उल्लेख अजिबात केलेला नाही. अर्थातच त्यांना संस्काराचा अधिकार वैदिक मंत्रांनी नाही हे उघडच आहे. त्यांच्यावर संस्कार करायचेच झाले तर ते मंत्ररहित आणि ह्या संस्कारांपैकी काही ठराविक संस्कारांना धर्मशास्त्रांनी परवानगी दिली आहे.

संस्कारांपैकी गर्भाधान, पुंसवन आणि सीमन्तोन्नयन हे तीन संस्कार मातेशी संबंधित असे आहेत. "पुंसवन व सीमंतोन्नयन हे गर्भवतीचे संस्कार फक्त पहिल्या गर्भधारणेच्या वेळेस करावेत, प्रत्येक गर्भाच्या वेळी ते पुन्हा करण्याची आवश्यकता नाही असे म्हटले आहे."[7]

## स्त्री संस्कारविषयी याज्ञवल्क्याचे मत :-

संस्काराचे वर्णन करीत असताना स्त्री संस्काराबाबतीत याज्ञवल्क्य लिहितो-

"तूष्णीमेताः क्रियाः स्त्रीणां विवाहस्तु समन्त्रकः"

"मुलींच्या क्रिया मंत्रावाचून कराव्यात, पण त्यांचा विवाह मात्र समंत्रकच होतो." या विधानाचा स्पष्ट अर्थ प्रतीत होतो की, पुरूषांचे विवाहासह सर्व संस्कार हे वैदिक मंत्रांनी युक्त तथापि स्त्रियांच्याबाबत मात्र विवाह हा एकमेव संस्कार मंत्रांनी युक्त आणि बाकीचे मंत्ररहित ।"

## उपनयन संस्कार :-

प्राचीन धर्मशास्त्राला अनुसरून प्रत्येक व्यक्तिबाबत उपनयन हा फार महत्वाचा संस्कार सांगितला आहे. व्यक्तिच्या वर्णाश्रमधर्मातील स्थान या संस्काराधारे केले जाते असे विधान केल्यास ते अतिशयोक्तीचे होऊ नये. या संस्कारामुळेच व्यक्तीला सुसंस्कारीत केले जाते, ज्ञानाची कवाडे उघडी होतात. परंतु याज्ञवल्क्याच्या वरील विधानातून असे दिसते की, स्त्रीचे उपनयन केले तरी ते अमंत्रक। आणि या गोष्टीला काहीच अर्थ उरत नाही. ते केले किंवा न केले दोन्ही एकसारखेच. एकंदरीत याज्ञवल्क्याने हा अधिकार स्त्रीबाबत नाकारला आहे. मिताक्षरासारामध्ये[9] उपनीत शिष्याला गुरूने वेद शिकवावा, शौच व आचार शिकवावे, हे सांगून झाल्यानंतर पुढे म्हटले आहे

"मुलांच्या उपनयनाच्या जागी मुलींचा विवाह आहे, त्यामुळे तो होण्याच्या पूर्वी मुलींना विशेष शौच व आचार उक्त नाहीत." ब्राह्मणांचे उपनयन हे आठव्या वर्षी, क्षत्रियाचे अकराव्या वर्षी आणि वैश्याचे बाराव्या वर्षी सांगितले आहे. यावरून असे दिसते की, मुलांच्या उपनयनाच्या जागी मुलींचा विवाह मानला आहे. यामुळे सर्वसाधारणपणे 8 वर्षे हे विवाहयोग्य वय मानलेले दिसते. एवढया लहान वयात पित्याच्या घरी पूर्ण शिक्षण होणे शक्य वाटत नाही. विवाहानंतर पतीला गुरू मानले तरी देखील पतिगृही, संसारात शिक्षण घ्यायला मुभा मिळेल याचाही असंभव वाटतो. अर्थातच उपनयनाचा स्त्रीचा अधिकार काढून याज्ञवल्क्याने तिची ज्ञानाची कवाडे बंद केली. तिचा व्यक्तिमत्व विकास खुंटविल्याचे ध्यानात येते. एकप्रकारे ही बाब स्त्री जातीच्या दृष्टीने अन्यायकारक वाटते. तेव्हा याज्ञवल्क्याने स्त्रीला उपनयनाचा, पर्यायाने शिक्षणाचा अधिकार नाकारल्यातच जमा आहे. त्यामुळे स्त्रीचे व्यक्तिमत्व तेजोहीन झाले.

आजच्या काळात उपनयनासारख्या संस्कारांना पूर्वीइतके महत्त्व न राहता ते औपचारिक बनले आहेत. उपनयन या प्रकरणात "दुष्परिणाम" या मुद्यासंबंधी बोलत असता डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात,[10] "उपनयनाचा ज्ञानार्जनाच्या अधिकाराशी व व्यक्तित्वविकासाच्या संधीशी विशेष संबंध राहिलेला नाही. अशा प्रकारच्या औपचारिक संस्काराचा अधिकार न दिल्यामुळे स्त्रियांवर काही अन्याय झाला वा त्यांचे काही नुकसान झाले असे मानण्याचे कारण नाही, असे कोणीही म्हणेल. परंतु हे म्हणणे योग्य नाही. कारण आज हा विधी औपचारिक बनला असला तरी पूर्वी तो प्रतिष्ठित जीवनाचे प्रवेशद्वारच होता. त्या काळात या संस्काराचा अधिकार नाकारणे हे प्रतिष्ठित जीवनाचा अधिकार नाकारण्यासारखेच होते. उपनयन नाकारल्यामुळे स्त्रियांचा शिक्षणाचा मार्ग बंद झाला. स्त्रियांचा दर्जा शूद्रांप्रमाणे हीन मानला गेला, त्याचे एक महत्त्वाचे कारण त्यांना उपनयनाचा अधिकार नाकारला गेला, हे होते. तात्पर्य, उपनयनाचा अधिकार नाकारणे म्हणजे स्त्रियांना शेकडो वर्षांकरिता अज्ञानाच्या आणि तज्जन्य दुष्परिणामांच्या अंधारात ढकलणे अशीच स्थिती होती."

डॉ. साळुंखे यांनी व्यक्त केलेले हे विचार याज्ञवल्क्यस्मृतीच्या संदर्भात ध्यानात घेता, याज्ञवल्क्याने स्त्रियांचा समंत्रक उपनयनाचा अधिकार नाकारून त्यांच्यावर अन्याय केला आहे. शिक्षणापासून तिला वंचित ठेवून तिची उपेक्षा केली आहे असे म्हणावे वाटते.

**स्त्री जन्माविषयी :-**

विवाहप्रकरणामध्ये याज्ञवल्क्याने स्त्री सेवन इ. विषयी नियम सांगितला आहे.

"षोडशर्तुनिशाः स्त्रीणां तस्मिन् युग्मासु संविशेत्।
ब्रह्मचार्येव पर्वाण्याद्याश्चतस्त्रश्च वर्जयेत्।।"

या श्लोकाविषयी मिताक्षरामध्ये म्हटले आहे "ज्या दिवशी रजोदर्शन होते. त्या दिवसापासून सोळा दिवस स्त्रियांचा गर्भधारण करण्यास योग्य काल असतो. या कालासच ऋतु म्हणतात. या सोळा रात्रीतील सहा, आठ, दहा, बारा, चौदा, सोळा या समरात्री स्त्रीसमागम करावा. या समरात्री सोडून बाकीच्या सर्व निषिद्ध रात्री वर्ज्य कराव्यात. दिवसाही स्त्रीसंग करू नये. शिवाय अमावस्या, पौर्णिमा, अष्टमी, चतुर्दशी ही पर्वे व पहिल्या चार रात्री यास वर्ज्य करावे. हे नियम पाळणारा गृहस्थ ब्रह्मचारीच होय. अनिषिद्ध सर्व रात्री गमन केल्यासही प्रत्यवाय नाही.

यानंतरच्या श्लोकामध्ये याज्ञवल्क्य म्हणतो -

"एवं गच्छन्स्त्रियं क्षामां मघां मूलं च वर्जयेत्।
सुस्थ इन्दौ सत्कृतपुत्रं लक्षण्यं जनयेत्पुमान्।।"[12]

"याप्रमाणे गमन करणा-या पुरुषाने मघा व मूळ या नक्षत्रांस वर्ज्य करून पुत्रच व्हावा या इच्छेने थोडा व हलका आहार देऊन कृश केलेल्या स्त्रीशी एकादशादि शुभस्थानी चंद्र असता एकच वेळा गमन करावे. अशा रीतीने गमन करणारा पुरुष सर्वलक्षणसंपन्न पुत्रच निर्माण करेल."

अपरार्कादि टीकेमध्ये -

"रजोदर्शन प्रभृति षोडशाहोरात्रात्मकः
स्त्रीणाम् ऋतुगर्भग्रहणकालः। तं कालं प्रसिद्धमनूद्य विदधानि,
तस्मिन्युग्मासु संविशेत्। इति। संविशेत्पुत्रं जनयितुम्।
"लक्षण्यं जनयेत्सुतम्"इति वाक्यशेषात्"

असे म्हटले आहे. या टीकेत आणि दीपकलिकेमध्ये मनुस्मृतीमधील "गच्छेत् पुत्रार्थं कन्या अयुग्मासु रात्रिषु {3/48} या वचनाचा उल्लेख आला आहे.

रजोदर्शनानंतर सोळा रात्री गर्भ राहण्यासाठी अधिक अनुकूल असतात. "समरात्रीला समागम करावा" असे याज्ञवल्क्याने स्पष्टपणे सांगितले आहे. सोळा रात्रीपैकी सहा, आठ, दहा, बारा, चौदा, सोळा अशा समरात्री समागम केल्यास निश्चितपणे पुत्रप्राप्ती होते. तेव्हा "या निषिद्ध रात्री टाळाव्यात" असे मिताक्षराकारानेही म्हटले आहे. यापुढील श्लोकातच "लक्षण्यं जनयेत् पुमान्" असे स्पष्टपणे म्हटले आहे.

डॉ. आ. ह. साळुंखे याबाबत म्हणतात[13] "शुभ अशी सम संख्या पुत्रकारक आणि अशुभ अशी विषम संख्या कन्याकारक अशा स्वरूपाची यामागची श्रद्धा ध्यानात घेतली असता सम रात्रीलाच समागम करावा, विषम रात्री धोक्याच्या असतात, असा इशारा देण्यासाठीच हा नियम करण्यात आला हे स्पष्ट आहे."

एकंदरीत कन्याजन्मापेक्षा पुत्रजन्माला महत्त्व दिल्याचे याज्ञवल्क्याच्या वरील नियमावरून दिसते. पुत्रजन्मासाठी पुंसवनासारखे विधीही सांगितले आहेत. गर्भाधानापासून स्त्रीला मुलगा व्हावा अशी अपेक्षा या ठिकाणी दिसते. वैदिक काळापासून ते थेट आजपर्यंत देखील काही अपवाद वगळता जगातील सर्व मानवांना पुत्राचाच जन्म व्हावा, असे मनोमन वाटत असते. मुलगा की मुलगी याविषयी प्रत्येकाच्या मनात अगदी औत्सुक्य दाटलेले दिसते. बहुधा मुलगाच व्हावा अशी इच्छा, स्त्री असलेल्या मातेची देखील असते. "समरात्रीला समागम" किंवा "लक्षण्यं जनयेत् पुत्रम्" यामधून पुत्रप्राप्तीबाबत अनिवार इच्छा व्यक्त केलेली दिसते. जी स्त्री बालकाला जन्म घालते तिचे अस्तित्वच नको वाटणे, नाकारणे हे स्त्री जातीवर अन्यायकारक तर आहेच, पण हास्यास्पद देखील आहे. पुत्रजन्माला महत्त्व देणा-या याज्ञवल्क्याच्या नियमावर एका पक्षाने विचार केला असता असे मला वाटते. तथापि आणखी एक विचार येतो तो असा-

"विषमरात्री समागम" केल्यास कन्याप्राप्ती झालीच तर तिचा अस्वीकार किंवा तिरस्कार केल्याचा उल्लेख या स्मृतीत कोठेही आढळत नाही. हल्ली गर्भजल परीक्षेच्या आधारे कन्यागर्भ असेल तर त्याचा अस्वीकार केला जातो. अवयवांची वाढ पूर्णावसथेत पोहोचत आलेला गर्भ मारला जातो. अतिशय निंद्य, घृणास्पद अशी ही गोष्ट होय. तथापि यापेक्षा याज्ञवल्क्याने व्यक्त केलेले विचार कितीतरी पटीने कमी निंदनीय आहेत असे वाटते.

**सारांश :-**

1· धर्मशास्त्रांच्या काळात संस्कारांना अतिशय महत्त्व होते· संस्कारांनी व्यक्तिमत्वाचा विकास होतो असे समजले जाई· म्हणून स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा विचार करावयाचा झाल्यास तिच्यावरील संस्कारांचा विचार करणे गरजेचे आहे·

2· गर्भाधान, पुंसवन इ·संस्कार विवाहित स्त्रीवर होतात· पण त्यात विचार गर्भाचा असतो· तो गर्भ पुरुष की स्त्री हे त्या काळात समजत नव्हते तरी, तो पुत्र असावा या कामनेने केले जात· म्हणजे त्या संस्कारातून स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा विकास अभिप्रेत नसून गर्भस्थ पुरुषाचा विकास अभिप्रेत आहे·

3· स्त्रीचे उपनयन अमंत्रक· उपनयनाऐवजी विवाह म्हणजे उपनयन नाकारणे, म्हणजे शिक्षण नाकारणे· म्हणजेच तिचे व्यक्तिमत्त्व खुंटविण्यासारखे होय·

4· विवाहानंतर स्त्री समागमाविषयी सांगितलेले सर्व संस्कार स्त्रीच्या पोटी पुत्र जन्मावा या कामनेनेच केलेले आहेत· तिला मुलगी व्हावी असा विचार कोठेच आढळत नाही· येथे स्त्री म्हणजे पुत्र निर्मितीची व्यक्ती किंवा साधन याहून तिला महत्त्व नाही· "क्षेत्र" हेच तिचे स्वरुप आहे·

5· तेव्हा या संस्कारांनी स्त्रीला काही अधिकार दिले आहेत असे म्हणता येत नाही·

SHIVAJI U... LIBRARY KOLHAPUR

संदर्भ :-


1. संस्कृती कोश खण्ड : 9, पृष्ठ 562
2. हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञान : ले.स.अ.डांगे, पृ.210
3. या.स्मृ.1.10
4. या.स्मृ.1.11 व 12
5. या.स्मृ.1.2.14
6. या.स्मृ.1.2.13
7. या.स्मृ.मि.सार 1.2.12
8. या.स्मृ.1.2.13
9. या.स्मृ.मि.सार 1.2.25
10. हिंदू संस्कृती आणि स्त्री : डॉ.आ.ह.साळुंखे, पृ.26
11. या.स्मृ.1.3.79
12. या.स्मृ.1.3.80
13. हिंदू संस्कृती आणि स्त्री : डॉ.आ.ह.साळुंखे, पृ.11